तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ ९६९६२३४ फॅक्स ९६९६२३४ Email : ropune.dte@gmail.com

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था/निवेदन/२०१७/ 5280 दिनांक : 30 DEC 2017

प्रति,

प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित
पदवी व पदविका संस्था.

विषय : कर्मचाऱ्यांच्या तक्रारीबाबत प्राप्त होणाऱ्या निवेदनांबाबत...

उपरोक्त विषयासंदर्भात असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याचशा संस्थांमधील / कार्यालयांमधील वर्ग ३ व वर्ग ४ चे कर्मचारी प्राचार्यांचे अभिप्राय न घेता परस्पर या कार्यालयाकडे, तसेच मुख्य कार्यालयाकडे, शासनाकडे तक्रारवजा निवेदने सादर करीत असतात. यामुळे प्राचार्यांचे अभिप्राय व प्रकरणांची सद्यःस्थिती लक्षात घेण्यांकरिता या कार्यालयामार्फत नाहक पत्रव्यवहार केला जातो.

तरी याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, यापुढे कर्मचाऱ्यांचे निवेदन प्राचार्यांमार्फत त्यांच्या अभिप्रायांसह व सद्यःस्थितीसह या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच कर्मचाऱ्यांच्या निवेदनाची दखल घेतली जाईल. अन्यथा कर्मचाऱ्यांनी परस्पर दिलेले निवेदन या कार्यालयामार्फत दफ्तरी दाखल करण्यांत येईल. कृपया ही बाब आपण आपल्या संस्थेतील / कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या (वर्ग ३ व वर्ग ४) नजरेस आणावी व तसे केल्याचे या कार्यालयास कळवावे.

(डॉ.दि. रा. नंदनवार),
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

D/My Documents/Misc.doc/6